# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १८/०३/२०१८

## गावकऱ्यांनी केले नक्षल स्मारक उध्दवस्त

उपविभाग भामरागड अंतर्गत पोलीस मदत केंद्र धोडराज हद्दीतील मौजा नेलगुंडा, मौजा मिडदापली, मौजा गोंगवाडा, मौजा पेनगुंडा या गावात नक्षलवादयांनी बांधलेले नक्षल स्मारक येथील ग्रामस्थांनी आज गुढीपाडव्याच्या व मराठी नुतन वर्षानिमित्ताने उत्स्फूर्तपणे एकत्र येत उध्वस्त केले. त्याचबरोबर गावकऱ्यांनी नक्षलवादयांना यापुढे कोणत्याही प्रकारची मदत न करण्याची शपथ यावेळी घेतली.

वर्षानुर्षे दुर्गम भागातील आदिवासी समाजाला भीती दाखवत बंदुकीच्या जोरावर आपल्या स्वतःच्या फायदयासाठी नक्षलवादी हे कुठल्याही प्रकारचा विकास होऊ देत नाहीत. आपली प्रगती साधायची असेल तर यापुढे आपण नक्षलवादयांना मदत करता कामा नये अशी भावना उपस्थित २०० ते २५० गावकऱ्यांनी व्यक्त केली.





